निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३१८ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * मंगळवार दि.२४ मार्च २०२६ | * पाने-४

## इराणविरोधातील हल्ल्यांना अमेरिकेकडून ५ दिवसांची स्थगिती

### ट्रम्प यांची मोठी घोषणा; सकारात्मक चर्चांबाबतही दिली माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**वाशिंग्टन** – मध्य पूर्वेतील तणाव कमी करण्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणबरोबर सातत्याने चर्चा करत होते. याबाबत आता मोठी बातमी समोर आली आहे. या चर्चा सकारात्मक आणि फलदायी ठरल्या असून इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवरील नियोजित लष्करी हल्ल्यांना तात्पुरती स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. याबाबत त्यांनी त्यांच्या ट्रूथवरील पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली.



होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली करा, अन्यथा इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करू, असा थेट इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यांच्या या इशाऱ्याला गांभीर्याने घेऊन इराणने शत्रू देशांना वगळता इतर देशांकरिता हा मार्ग खुला केला. इराणने अमेरिकेच्या आदेशाचे पालन केल्याने अमेरिकेनेही आता इराणवरील ऊर्जा प्रकल्पांवरील नियोजित हल्ल्यांना स्थगिती दिली आहे.

याबाबत डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, ''मला हे कळवताना आनंद होत आहे की, गेल्या दोन दिवसांत युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि इराण या देशांमध्ये मध्यपूर्वेतील आपल्या संघर्षाच्या संपूर्ण आणि कायमस्वरूपी निराकरणाबाबत अतिशय सकारात्मक आणि फलदायी चर्चा झाली आहे.या सखोल, तपशीलवार आणि रचनात्मक चर्चेचा सूर आणि कल लक्षात घेता, ही चर्चा आठवडाभर सुरू राहणार आहे. मी संरक्षण विभागाला इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे कोणतेही आणि सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत. हा निर्णय सध्या सुरू असलेल्या बैठका आणि चर्चेच्या यशावर अवलंबून असेल. या विषयाकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद.'' ट्रम्प यांच्या आधीच्या इशाऱ्याला इराणनेही जशास तसे उत्तर दिले होते. आपल्या पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला झाल्यास संपूर्ण प्रदेशात त्याचे तीव्र पडसाद उमटतील आणि प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा इराणने दिला होता. इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाकर कालीबाफ यांनी म्हटले होते की, जर तेहरानला लक्ष्य केले गेले तर महत्त्वाची ठिकाणे ''कायमस्वरूपी नष्ट'' होऊ शकतात. तसेच, अमेरिकन तळ असलेल्या देशांमधील ऊर्जा केंद्रेही आमचे ''कायदेशीर'' लक्ष्य असतील, असा इशारा 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'ने दिला होता.

### स्थगितीच्या निर्णयावर इराणने अमेरिकेचे दावे फेटाळले

मध्य पूर्वेतील तणाव कमी होण्याच्या दृष्टीने अमेरिका आणि इराम यांच्यात चर्चा सुरू असून त्यातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या चर्चा सकारात्मक सुरू असून पाच दिवसांची स्थगिती देण्यात आल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. मात्र, हा दावा इराणने फेटाळून लावला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी माघार घेतली असून युद्ध स्थगितीचे आदेश दिले असं अफगाणिस्तानमधील इराणच्या दूतावासांनी म्हटलंय. इराणने दिलेल्या कडक इशाऱ्यानंतर ट्रम्प यांची माघार. इस्लामिक रिपब्लिकने (इराण) असा इशारा दिला होता की, जर अमेरिकेने इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला केला, तर इराण संपूर्ण प्रदेशातील ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करेल. या इशाऱ्यानंतर ट्रम्प यांनी माघार घेतली आणि त्यांनी हा हल्ला पुढे ढकलण्याचे आदेश दिल्याचे जाहीर केले'', असं दूतावासांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांच्या आधीच्या इशाऱ्याला इराणनेही जशास तसे उत्तर दिले होते. आपल्या पायाभूत सुविधांवर कोणताही हल्ला झाल्यास संपूर्ण प्रदेशात त्याचे तीव्र पडसाद उमटतील आणि प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा इराणने दिला होता. इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बाकर कालीबाफ यांनी म्हटले होते की, जर तेहरानला लक्ष्य केले गेले तर महत्त्वाची ठिकाणे ''कायमस्वरूपी नष्ट'' होऊ शकतात. तसेच, अमेरिकन तळ असलेल्या देशांमधील ऊर्जा केंद्रेही आमचे ''कायदेशीर'' लक्ष्य असतील, असा इशारा 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'ने दिला होता.

## हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद करणे स्वीकारार्ह नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत मांडली भूमिका

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – ''हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद करणे स्वीकारार्ह नाही,'' अशा कडक शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत आपली भूमिका स्पष्ट केली. पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी भारत सज्ज असून, सामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत याची झळ पोहोचू देणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



''पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर आधीच भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील सर्व देशातील संबंधित नेत्यांशी मी चर्चा केली आहे. मी स्वतः हा तणाव कमी करून थांबवण्याचा आग्रह केला आहे. भारताने भारतीय नागरीक, ऊर्जा आणि वाहतुकीशी संबंधित हल्ल्यांचा विरोध केला आहे. व्यावसायिक जहाजांवरील हल्ला आणि होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या आंतरराष्ट्रीय जलमार्गावरील बंदी अस्वीकार्य आहे. भारत डिप्लोमसीप्रमाणे युद्धाच्या परिस्थितीतही जहाजांच्या हालचालींकरता निरंतर प्रयत्न करत आहे. भारत प्रत्येकवेळी मानवतेच्या हिताकरता आणि शांतीच्या बाजूने आवाज उठवत राहिला आहे. संवाद आणि कुटनीतीतच या समस्येचं समाधान आहे. आमचा प्रत्येक प्रयत्न तणाव कमी करून संघर्ष संपवण्यासाठी आहे'', असं मोदी म्हणाले.

''या युद्धात कोणत्याही जीवनावरील संकट मानवतेच्या हिताचं नाही. त्यामुळे भारताचा प्रयत्न सर्व पक्षांना लवकरात लवकर शांतीपूर्व समाधानाकरता प्रोत्साहित करत आहे. असे संकट येतात तेव्हा काही तत्त्वे याचा गैरफायदा उचलण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांना हायअलर्टवर ठेवण्यात आले आहे. सागरी सुरक्षा, सीमा सुरक्षा, सायबर सुरक्षा मजबूत केल्या जात आहेत.

या युद्धामुळे जगातील कठीण परिस्थिती दीर्घकाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला तयार राहावं लागेल आणि एकजूट राहावं लागेल. आपण करोनाच्या वेळीही एकजुट राहून काम केलं. आताही त्याचप्रमाणे तयार राहण्याची गरज आहे. संयम, धैर्याने, शांत मनाने सामना करायचा आहे. हीच आपली ओळख आहे'', असंही खास आवाहन नरेंद्र मोदी यांनी केलं.

## मुंबईत मिळकतीचे फेरफार आता ऑनलाईन; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – मुंबई शहर जिल्ह्यातील मिळकतीच्या फेरफार प्रक्रियेला आता डिजिटल गती मिळाली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईतील सुमारे ३० लाख नागरिकांना याचा लाभ होणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत विधानसभेत निवेदन करताना सांगितले. मुंबईत प्रथमच मिळकतीचे फेरफार ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहर व उर्वरित महाराष्ट्रातील प्रॉपर्टी कार्ड संगणकीकरणाच्या प्रणाली वेगवेगळ्या असल्यामुळे आतापर्यंत मुंबईत ऑनलाईन फेरफार प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या. मात्र नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन शासनाने या प्रक्रियेला गती दिली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील १९ महसूल विभाग व ४ नगर रचना योजनांमधील सुमारे २७,८४७ मिळकती पत्रिका https://mahabhumi.gov.in/ या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

यासाठी विशेष ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली असून पोर्टलद्वारे नागरिकांना घरबसल्या फेरफारसाठी अर्ज करता येणार आहेत. अर्जाची स्थितीही ऑनलाईन तपासता येणार असल्यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहर जिल्ह्यात प्रथमच तब्बल ४५ प्रकारच्या फेरफारांसाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये खरेदीखत, वारसा, बक्षीसपत्र, भाडेपट्टा, गहाणखत, रोड सेटबॅक, आरक्षण आणि भूसंपादन अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी विकसित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा लाभ मुंबईतील सुमारे ३० लाख नागरिकांना होणार असल्याचे सांगून मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांचे हा उपक्रम राबविल्याबद्दल मंत्री बावनकुळे यांनी अभिनंदन केले.

## १४ किलोच्या सिलेंडरमध्ये ८ ते १० किलो एलपीजी भरणार, जेवढा गॅस तेवढेच पैसे द्यावे लागणार, घरगुती गॅस सिलेंडरबाबत सरकारचा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणात महत्वाचा बदल करण्याचे सरकारने ठरवले आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर नागरिकांना आता अर्ध्याच वजनाचा मिळणार आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर १४.२ किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येतो. मात्र, आता हा घरगुती वापराचा गॅस ८ ते १० किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येणार आहे. सिलेंडर तोच राहणार आहे. मात्र, त्यामध्ये गॅस आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्याचे आदेश गॅस कंपन्यांना देण्यात आलेत. जेवढा गॅस असेल तेवढे पैसे आकारले जाणार आहेत. युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या भरुन तयार असलेले १४.२ किलोचे सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्यात येणार आहेत. यापुढे गॅस सिलेंडर कमी वजनाचे असल्याने ते साहजिकच कमी दिवस पुरणार आहेत. त्यामुळे सामान्य घरातील दैनंदिन गणित बिघडणार आहे. यावर सामान्य नागरिक कशाप्रकारे व्यक्त होणार, हे बघावे लागेल. याशिवाय, कमी वजनाच्या या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत किती असणार, याकडेही सगळ्यांच्या नजरा आहेत.

इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल हे युद्ध दिवसेंदिवस चिघळताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इस्रायलने इराणमधील गॅस फिल्ड आणि खनिज तेलाचे साठे असलेल्या परिसरांमध्ये हवाई हल्ले केले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने कतारमधील सर्वात मोठा नैसर्गिक वायूचा साठा असलेल्या परिसराला लक्ष्य केले आहे. यामुळे युद्ध संपल्यानंतरही या सुविधा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ जावा लागेल. त्यामुळे पुढील काही महिने जगभरात गॅसची टंचाई असेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने आवश्यक ती पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये एलपीजी गॅसच्या तुटवड्याच्या भीतीने नागरिकांनी अनेक ठिकाणी गॅस एजन्सीबाहेर रांगा लावल्याचे दिसून आले होते. सरकारने वारंवार आवाहन करुनही नागरिकांना घरगुती सिलेंडर मिळणार की नाही, याबाबत धास्ती कायम आहे. दरम्यान, गॅसच्या तुटवड्यामुळे सरकारने व्यावसायिक वापराच्या एलपीजीसाठी गॅस पुरवठा बंद केला होता.

त्यामुळे हॉटेल इंडस्ट्रीवर गंडांतर ओढवले होते. मात्र, आता मध्यपूर्वेतील (इराण-इस्त्रायल) युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली गॅस टंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने व्यावसायिक पुरवठ्यात २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील हॉटेल्स, ढाबे आणि अन्न प्रक्रिया उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असून, वाढीव पुरवठा तत्काळ लागू करण्यात आला आहे.

## नीलम गोऱ्हेंकडून सातारा एसपींचे तत्काळ निलंबनाने निर्देश; मंत्री जयकुमार गोरेंचा निलंबनाला कडाडून विरोध, सत्ताधाऱ्यांमध्येच आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठा गोंधळ उडाला होता. पालकमंत्री शंभूराज देसाई आणि कॅबिनेट मंत्री मकरंद पाटील यांना आपल्या सदस्यांना सभागृहात नेण्यासाठी पोलिस आणि प्रशासनाशी झुंज द्यावी लागली. या धक्काबुकीत शंभूराज देसाई जखमी झाले, तर मकरंद पाटील यांना २०-२५ पोलिसांनी घेरल्याची घटना घडली होती. प्रशासकीय यंत्रणेचा वापर करून भाजपने आपला अध्यक्ष निवडून आणल्याचा आरोप करण्यात येत आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान झालेल्या अभूतपूर्व गोंधळाची विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी सातारा पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे आदेश दिले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पुण्याच्या विभागीय आयुक्तांना दिले आहेत. तर मंत्री जयकुमार गोरे यांनी या निलंबनाला कडाडून विरोध केला. यामुळे विधानपरिषदेत सत्ताधाऱ्यांमध्येच आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्याचे दिसून आले.

जयकुमार गोरे म्हणाले की, सभापती महोदया तुम्ही निर्देश देण्यापूर्वी वस्तुस्थिती जाणून घेणे गरजेचे होतं, तत्पूर्वी तुम्ही निर्देश दिले. ज्याचं अपहरण झालं तो राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आहे. त्यांच्या कुटुंबियांनी अपहरण झाल्याचा गुन्हा नोंद केला होता. कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याचे करण्याचे काम कुणी केले. चार हजार लोकं जिल्हा परिषदेत घुसले ते कुणी आणले? याचे देखील उत्तर द्यायला हवे, असे त्यांनी म्हटले.

जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, सभापती महोदया तुम्ही माझ म्हणणं ऐकून घ्या ना. तुम्ही ऐकून घेत नाहीत. मी देखील वस्तुस्थिती सांगत आहे. तुम्ही माझ म्हणणं ऐकून घ्या, असे म्हटले. यावर नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात पोलीस घुसले होते की नव्हते ते तुम्ही सांगा? असे म्हटले.

यावर जयकुमार गोरे म्हणाले की, सभापती महोदय तुम्ही कोणत्या प्रकारे वस्तुस्थिती जाणून न घेता एका अधिकाऱ्याला निलंबित करता कसं काय? तो आयपीएस दर्जाचा अधिकारी आहे. तुम्ही असा कसा निर्णय घेतला? तुमच्या निर्णयावर हरकत नाही. मात्र, जो निर्णय झाला आहे तो चुकीचा आहे. कार्यकर्ते कोणी आणले? भाजपवर कसं काय आरोप करता? तिथे जबरदस्ती सीइओ यांना बैठक कोणी घ्यायला लावली? असे म्हणत त्यांनी निलंबनाला कडाडून विरोध केल्याचे पाहायला मिळाले.

## अशोक खरातला पाठिशी घालणारे तीन अधिकारी कोण?; विरोधकांचा खळबळजनक आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कर्तृत्वाचे पडसाद आज विधानसभेतही उमटले. महाविकास आघाडीच्या तीन आमदारांनी या प्रकरणातील धक्कादायक माहिती सभागृहात मांडली. काँग्रेसचे ब्रम्हपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणात तीन बड्या सनदी अधिकाऱ्यांचे लागेबांधे असल्याचा आरोप केला; तर आमदार नाना पटोले यांनी या विषयावर विधानसभेत विशेष चर्चा घडवून आणण्याची मागणी केली. त्याशिवाय ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनीही पुरोगामी महाराष्ट्राचे उदाहरण देत सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. विरोधकांच्या या आक्रमकतेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे उत्तर दिले. त्याविषयीचा हा आढावा

आमदार विजय वडेट्टीवार यांनी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी धक्कादायक माहिती सभागृहासमोर ठेवली. पुरोगामी महाराष्ट्रात धर्माच्या नावाखाली महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरातसारख्या भोंदू बाबांना अभय मिळणे, ही अत्यंत शरमेची बाब आहे. ज्योतिषशास्त्राच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करणाऱ्या या भोंदूचे १०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आले आहेत. या विकृत प्रवृत्तीमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेला तडा जात असून, हे खपवून घेतले जाणार नाही.सर्वात धक्कादायक म्हणजे या भोंदू बाबाला अटक होऊ नये म्हणून शासनाचे उच्चपदस्थ आयएएस-आयपीएस आणि महसूल अधिकारी एका हॉटेलमध्ये बैठका घेत होते. जे अधिकारी आणि मंत्री संविधानाची शपथ घेतात, तेच जर अशा भोंदूंच्या पाया पडत असतील, तर सामान्य जनतेने न्याय कोणाकडे मागायचा? केवळ एसआयटीकडे तपास देऊन हे प्रकरण शांत होणार नाही, यात सामील असलेल्या प्रत्येक मंत्र्याचा राजीनामा आणि दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन झालेच पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा आधीच पोलिसांमार्फत तपास केला जात असल्याने त्यावर आज सभागृहात कोणतीही चर्चा होणार नसल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनीही अशोक खरात प्रकरणावरून सभागृहात विविध प्रश्न उपस्थित केले. यादरम्यान त्यांनी काही मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीदेखील केली.

महाराष्ट्र हे शाहू-फुले-आंबेडकरांचे राज्य आहे. अशा राज्यात एका भोंदूबाबाचा वरचश्मा चालतो आणि त्याला सत्ताधारी मंत्र्यांचे आशीर्वाद लाभतात. ज्या मंत्र्यांचे या भोंदूबाबाबरोबर संबंध आहेत, त्यांनी तत्काळ राजीनामा दिला पाहिजे. या विषयावर विधानसभेत विशेष चर्चा घडवून आणून दूध का दूध पाणी का पाणी झालेच पाहिजे, असे पटोले म्हणाले.




## एपस्टिन फाईल्सबाबत आरएसएसने पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे स्पष्टीकरण मागावे; काँग्रेस आक्रमक

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कथित 'एपस्टीन फाईल्स' मध्ये नाव असण्याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोदींकडून स्पष्टीकरण मागावे, अशी मागणी करीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने सोमवारी शहरात मोर्चा काढला. संविधान चौकातून निघालेला हा मोर्चा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयाकडे निघाला होता; मात्र पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवत तो मॉरिस कॉलेज चौकात अडवला. येथे आंदोलकांनी भाजप व संघाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

संविधान चौकात झालेल्या सभेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनातून संघाने या प्रकरणात स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. 'एपस्टीन फाईल्स'सारख्या गंभीर मुद्द्यावर पंतप्रधानांचे नाव समोर येणे चिंताजनक असून देशासमोर सत्य मांडले गेले पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.

सपकाळ यांनी संघाचे सरसंघचालक मोहन भागवत दिल्लीला रवाना झाल्याबद्दलही प्रश्न उपस्थित केले. ''आमचे प्रतिनिधीमंडळ चर्चा करण्यासाठी आले असताना त्यांनी भेट का टाळली ?'' असा सवाल त्यांनी केला. पंतप्रधान या मुद्द्यावर मौन का बाळगत आहेत, तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर स्पष्ट भूमिका का घेत नाहीत, यावरही त्यांनी टीका केली. संघानेच पुढाकार घेऊन पंतप्रधानांकडून राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले, मोर्च्याची पूर्वकल्पना संघाला दिली होती. अमेरिकेसोबतच्या व्यापार करारांपासून ते शेतकरीविरोधी धोरणांपर्यंत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शवली होती, देशातील बँकिंग व्यवस्था कमकुवत होत असून रुपयाचे अवमूल्यन सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

आंबेडकर यांनी 'एपस्टीन फाईल्स'चा केवळ काही भागच समोर आल्याचा दावा करत आणखी माहिती बाहेर येण्याची शक्यता व्यक्त केली. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचे अनुकरण करत असल्याची टीकाही केली. विचारधारांमध्ये मतभेद असले तरी देशहितासाठी संघाने ठाम भूमिका घ्यावी आणि पंतप्रधानांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली.

# कॉंग्रेस आरशात बघेल?

दिवंगत समाजवादी नेते जनेश्वर मिश्रा म्हणत, 'राज्यसभा ही केवळ आकड्यांची लढाई नसते; तो राजकीय दिशेचा आरसाही असतो.' आज या आरशात पाहण्याची हिंमत कॉंग्रेससह विरोधक दाखवणार का, एवढाच काय तो प्रश्न ! सन २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार आले. त्यानंतरच्या पहिल्याच संसदीय अधिवेशनात राष्ट्रपती अभिभाषणावरील राज्यसभेतल्या चर्चेनंतर आभार प्रदर्शक ठरावावर माकप नेते सीताराम येचुरी यांनी अनपेक्षितपणे मतदान मागितले तेव्हा भाजपच्या बाजूला उडालेली धावपळ, नंतर झालेले मतदान, त्यात झालेला त्या नव्या कोऱ्या सरकारचा तांत्रिक पण पहिला पराभव आणि पंतप्रधानांच्या चेहऱ्यावरचे संतप्त भाव हे दृश्य १२ वर्षांनी जसेच्या तसे आठवण्याचे ताजे कारण म्हणजे यंदाची राज्यसभा निवडणूक. भाजपने या निवडणुकीनंतर राज्यसभेच्या इतिहासात अत्यंत कमी वेळा सत्तारूढ पक्षाला गाठता आलेला बहुमताचा आकडा ओलांडून १४० सदस्यांचे दणदणीत बहुमत मिळवले. सन २०१४ नंतर, वर्षातून एखाददुसऱ्या वेळेस राज्यसभेत येणारे पंतप्रधान गेल्या जेमतेम महिन्यात येथे दोनदा भाषणे करते झाले आहेत, हे या दृष्टीनेही सूचक. सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला २४० जागा मिळाल्या, तेव्हा दिल्लीतील राजकीय जाणकार वगैरे वर्गाने, 'हा विजय, की इशारा?' असे चर्वण सुरू केले होते! २०१४ व २०१९ अशा सलग दोन वेळच्या बहुमताच्या पार्श्वभूमीवर तांत्रिकदृष्ट्या मोठा असला तरी २४० हा आकडा राजकीय मानसशास्त्रात 'घट, फटका' म्हणून पाहिला गेला. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपला आघाडीच्या आधारावर सरकार चालवावे लागणार अशी ही पहिलीच वेळ होती. पण भारतीय राजकारणाचा इतिहास सांगतो, की कधी कधी आकड्यांमागील एक अदृश्य राजकीय 'पटकथा' अधिक मोठी ठरते. मोदी-अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजप-एनडीएने लोकसभेत फटका बसलेल्या महाराष्ट्र, हरियाणा, ओडिशा यांबरोबरच बिहारसारख्या महत्त्वाच्या राज्यांत या राज्यसभा निवडणुकांत मिळवलेल्या विजयातून कॉंग्रेसच्या बुद्धिवाद्यांच्या 'कमजोर सरकार'च्या कथनाला आणखी एक धक्का दिला. रोज सकाळी ट्विटरवर मोदींना शिव्याशाप देण्याचे आन्हिक उरकले की झाले राजकारण, असे होऊ शकत नाही कधी. समजा २४० हा सत्तेवरून जा, असा 'इशारा' होता, तर भाजपच्या ताज्या राज्यसभा विजयाला हेच बुद्धिवंत काय उपमा देणार? का २४०चे आकलनच चुकीचे होते? या प्रश्नांना या बुद्धिवाद्यांना नाही, तरी गांधी घराण्याला भिडावेच लागणार आणि तसे केले नाही तर पश्चिम बंगालसह पुढच्या विधानसभा निवडणुकांसाठी भाजप सज्ज आहेच. खरे तर २४० ही संख्या कमी नाही. कॉंग्रेसला २०१४ नंतर मिळालेल्या एकूण जागांपेक्षा ती जास्त असली, तरी ही संख्याच सत्तेचे मजबूत पायाभूत गणित असणार हे भाजप नेतृत्वाने समजून घेतले. पण 'नैतिक विजया'चे भूत कॉंग्रेसच्या मानगुटीवरून उतरायला अजून तयार नाही. घटनाकारांनी केलेल्या संसदीय रचनेत कोणत्याही सरकारची खरी परीक्षा राज्यसभेतच असते. इथे बहुमत असणे म्हणजे फक्त निवडणूक जिंकणे नाही, तर दीर्घकालीन रणनीती यशस्वी होणे, असे मानले जाते. राज्यसभेत एकट्या भाजपने प्रथमच १००च्या पुढे मजल मारली आहे. राष्ट्रपतीनियुक्त पाच सदस्य धरले तर त्यांचा एकूण आकडा होतो १०६. एनडीएची एकूण ताकद १४०च्याही वर पोहोचली आहे. या टप्पात ३७ पैकी २२ जागा जिंकून भाजपने राज्यांमध्ये सत्ता, संघटन आणि आघाडी व्यवस्थापन यांचा एकत्रित परिणाम कसा होतो याच्या राजकीय 'ग्राउंड गेम'चेही दर्शन घडवले. कॉंग्रेसचे संख्याबळ भाजपच्या तुलनेत एक तृतीयांशपेक्षाही कमी २८ जागांवर आले आहे. द्रमुक १० वरून ८, राजद ५ वरून ३ (आणि लवकरच शून्य) अशी वजाबाकी होऊन विरोधकांची एकूण संख्या ६२ वर आली आहे. खरे तर संख्या कितीही असली तरी राज्यसभेत महत्त्वाची विधेयके मंजूर करण्यात फारशी अडचण येत नाही, हे भाजपने कधीच दाखवून दिले असले तरी २४५ सदस्यांच्या सभागृहात हा आकडा म्हणजे विरोधकांना सतत बचावाच्या पवित्र्यातच राहावे लागणार याचे निदर्शक आहे. महत्त्वाकांक्षी महिला आरक्षणाचा कायदा काहीही करून २०२९च्या आधी प्रत्यक्ष अंमलात आणण्यासही भाजपला आता काहीही अडचण दिसत नाही. आपल्या विरोधकांवर टीका करणे सोपे असते. पण राहुल गांधी यांचे राजकारण अजूनही 'नॅरेटिव्ह'मध्येच अडकले तर त्यावर बोलावे लागणारच. त्यांचे 'हम दो हमारे दो' किंवा 'सूटबूट की सरकार'पासून 'चौकीदार चोर है' आणि इतरही मुद्दे पाहा. राज्यघटनेला असलेला धोका हा मुद्दा वगळता गांधी यांनी एक मुद्दा सलगपणे लावून धरला असे झालेले नाही. आता चीनबाबतचे कथित गौप्यस्फोट करणाऱ्या एका अप्रकाशित पुस्तकाचेही तसेच होणार हे स्पष्ट आहे. एपस्टीन फाइल्सचा मुद्दा आणखी चांगल्या प्रकारे तापवता येईल, असे वातावरण असूनही राहुल यांचे राजकारण अजूनही 'भाजप लोकसभेत अल्पमतात' इथेच थांबल्यासारखे वाटते. राजकारणात स्वतःच्या वाढीचे मूल्यमापन करत नाही, तो आपोआप आक्रसत जातो, याचे धडधडीत उदाहरण डाव्यांच्या रूपाने समोर असूनही राहुल गांधी यांची त्या दिशेने जाण्याची इच्छा नाही, की त्यांचे दोघे कमांडर त्यात अडथळा ठरतात? सत्ता टिकवायची तर केवळ आकडे नव्हे, तर स्थैर्य आणि विश्वासही टिकवावा लागतो, असे अटलजी म्हणत. सध्या तरी हे दोन्ही घटक भाजप-एनडीएच्या बाजूनेच झुकलेले दिसतात. दिवंगत समाजवादी नेते जनेश्वर मिश्रा म्हणत, 'राज्यसभा ही केवळ आकड्यांची लढाई नसते; तो राजकीय दिशेचा आरसाही असतो.' आज या आरशात पाहण्याची हिंमत कॉंग्रेससह विरोधक दाखवणार का, एवढाच काय तो प्रश्न!

# माणगाव परिषद : सामाजिक क्रांतीचा एल्गार

भारतीय समाजव्यवस्थेतील जातीभेदाच्या भिंती पाडण्यासाठी आणि शोषित-वंचितांना आत्मभान मिळवून देण्यासाठी ज्या काही मोजक्या ऐतिहासिक घटना घडल्या, त्यात 'माणगाव परिषद' हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. २१ आणि २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील तत्कालीन कागल संस्थानातील माणगाव या छोट्याशा गावात ही परिषद संपन्न झाली. या परिषदेला आता १०६ वर्षे पूर्ण होत आहेत. ही परिषद केवळ एक राजकीय सभा नव्हती, तर ती भारतीय लोकशाहीच्या आणि सामाजिक समतेच्या प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता आणि तो पुढे एक सामाजिक क्रांतीचा एल्गार ठरला.




**दोन युगपुरुष एकाच मंचावर : शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर**

माणगाव परिषदेचे सर्वात ऐतिहासिक आणि रोमांचक वैशिष्ट्य म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन युगपुरुषांचे एकाच मंचावर येणे. त्यावेळी डॉ. आंबेडकर हे अवघ्या २९ वर्षांचे तरुण होते आणि नुकतेच विदेशातून उच्च शिक्षण घेऊन परतले होते. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्यातील अफाट बुद्धिमत्ता, तळमळ आणि नेतृत्वगुण ओळखले होते. महाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन डॉ. आंबेडकरांना या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवण्याची विनंती केली. एका बाजूला सत्तेचा आणि अधिकाराचा वापर लोककल्याणासाठी करणारे 'लोकराजा' आणि दुसऱ्या बाजूला पददलितांचे कैवारी बनलेले 'विद्वान' बाबासाहेब, असा हा अभूतपूर्व संगम होता.

**ऐतिहासिक भविष्यवाणी आणि नेतृत्वाचा उदय**

या परिषदेत राजर्षी शाहू महाराजांनी केलेले भाषण भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. महाराजांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले होते, तुम्हाला तुमचा नेता (डॉ. आंबेडकर) मिळाला आहे. माझी खात्री आहे की, ते केवळ तुमचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे नेते होतील. ही केवळ स्तुती नव्हती, तर एका द्रष्ट्या राजाने भविष्यातील महामानवावर ठेवलेला विश्वास होता. शाहू महाराजांनी जाहीरपणे डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व मान्य केले आणि समाजाला त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. या एका वाक्याने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आणि इथूनच एका नव्या पर्वाची सुरुवात झाली.

**परिषदेचे ठराव आणि सामाजिक परिणाम**

माणगाव परिषदेत केवळ भाषणे झाली नाहीत, तर सामाजिक परिवर्तनासाठी ठोस ठराव मंजूर करण्यात आले. त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता:

अस्पृश्यता निवारण: समाजात रुजलेली अस्पृश्यतेची अनिष्ट प्रथा मुळापासून उपटून टाकणे.

शिक्षण प्रसार: शोषित वर्गातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळवून देणे, कारण शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे.

राजकीय अधिकार: दलितांना विधिमंडळात आणि प्रशासनात योग्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी मागणी करणे.

स्वाभिमानाची जागृती: 'बहिष्कृत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाने स्वतःचा न्यूनगंड सोडून देऊन आत्मसन्मानाने जगण्यास शिकणे.

या परिषदेने डॉ. आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रासाठी देखील मोठे बळ दिले. शाहू महाराजांनी या वृत्तपत्राला आर्थिक मदत केली होती, जेणेकरून वंचितांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचू शकेल.

**माणगाव : एक सन्मानभूमी**

आज माणगाव (ता. हातकणंगले) ही भूमी 'सन्मानभूमी' म्हणून ओळखली जाते. दरवर्षी वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि 'बार्टी' पुणे यांच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी २१ मार्च रोजी 'क्रांतीचा साक्षीदार' हे एकपात्री नाटक, विविध मान्यवरांची व्याख्याने आणि २२ मार्च रोजी प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे व कबीर नाईकनवरे यांचा प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. ही आयोजने केवळ उत्सवी नसून, नव्या पिढीला महापुरुषांच्या विचारांची ओळख करून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

माणगाव परिषद ही समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची सुरुवात होती. या परिषदेने शिकवले की, जेव्हा सत्ता (शाहू महाराज) आणि ज्ञान (डॉ. आंबेडकर) एकत्र येतात, तेव्हा मोठी क्रांती घडते. आज १०६ वर्षांनंतरही जातीभेदाची आव्हाने आपल्यासमोर आहेत. अशा वेळी माणगाव परिषदेचा हा वारसा आपल्याला प्रेरणा देतो. महापुरुषांच्या विचारांना केवळ अभिवादन न करता, ते आचरणात आणणे हीच या ऐतिहासिक दिनाची खरी फलश्रुती ठरेल.

**- सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**कोल्हापूर**

# श्रद्धेच्या आड दडलेले अंधश्रद्धेचे वास्तव : कायद्याची अंमलबजावणी आणि जबाबदारीचा प्रश्न

महाराष्ट्र ही सामाजिक प्रबोधनाची, विवेकनिष्ठ विचारांची आणि परिवर्तनवादी चळवळींची भूमी म्हणून देशात एक वेगळी ओळख निर्माण करून आहे. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक इतिहासात अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीदमन आणि अन्याय यांविरुद्धचा लढा हा केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष कृतीतून उभा राहिलेला दिसतो.महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक विचार मांडत समाजातील अज्ञानाला आव्हान दिले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालत अंधश्रद्धा आणि स्त्रीदमनाला प्रत्यक्ष धक्का दिला, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे समतेचा मार्ग मोकळा केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि मानवी सन्मान या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. या वैचारिक परंपरेतूनच पुढे अंधश्रद्धेविरोधी चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात आला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणजे केवळ कायदेशीर चौकट नसून तो समाजाच्या विवेकनिष्ठतेचा आणि प्रबोधनपर भूमिकेचा पुरावा आहे. श्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या भोंदूगिरीला, फसवणुकीला आणि शोषणाला थांबवण्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु, वास्तवातील काही घटनांमुळे हा प्रश्न उभा राहतो की, कायदा असूनही अशा प्रकारच्या घटना का घडतात? विशेषतः महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली होणारे लैंगिक शोषण हे केवळ गुन्हेगारी प्रकरण नसून ते समाजाच्या मानसिकतेवर, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि सत्तेच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील भेद समजून घेणे ही या चर्चेची पहिली पायरी आहे. श्रद्धा ही मानवी जीवनाचा सकारात्मक भाग आहे. ती व्यक्तीला मानसिक आधार देते, जीवनातील संकटांमध्ये धैर्य देते आणि नैतिक मूल्यांची जपणूक करते. परंतु, जेव्हा श्रद्धा विवेकशून्य बनते, प्रश्न विचारण्याची क्षमता हरवते आणि ती अंधानुकरणात परिवर्तित होते, तेव्हा ती अंधश्रद्धा बनते. अंधश्रद्धा ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर, विचारशक्तीवर आणि सन्मानावर आघात करते. ती अनेकदा भीती, असुरक्षितता आणि अज्ञान यांच्यापासून जन्म घेते आणि त्यातून शोषणाला खतपाणी मिळते.

अलीकडील काळात काही घटनांमध्ये श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आले आहेत. या घटना केवळ व्यक्तीगत गुन्ह्यांच्या चौकटीत मर्यादित नसून त्या समाजातील अंधश्रद्धेच्या खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतीक आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःला दैवी शक्ती असलेली म्हणून सादर करते, चमत्कारांचे दावे करते आणि लोकांच्या समस्यांवर 'दैवी उपाय' सुचवते, तेव्हा काही लोक त्या व्यक्तीवर आंधळा विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेत काही भोंदू लोक महिलांचे मानसिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण करतात.

महिलांच्या संदर्भात अंधश्रद्धेचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. पितृसत्ताक समाजरचना, शिक्षणाचा अभाव, आर्थिक अवलंबित्व आणि सामाजिक दबाव यामुळे अनेक महिला अशा भोंदू व्यक्तींच्या जाळ्यात अडकतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या; जसे की आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक ताणतणाव, संततीप्राप्तीचे प्रश्न यावर उपाय शोधताना त्या अशा लोकांकडे वळतात. हीच परिस्थिती शोषणाला कारणीभूत ठरते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या कायद्याने अशा प्रकारच्या कृत्यांना स्पष्टपणे गुन्हा घोषित केले आहे. जादूटोणा, बुवाबाजी, खोटे चमत्कार, फसवणूक, तसेच शारीरिक आणि मानसिक छळ यांना या कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. तरीही, अशा घटना घडत राहतात, याचा अर्थ कायद्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत.

'कायद्याची अंमलबजावणी कोणी करायची?' हा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सैद्धांतिकदृष्ट्या, ही जबाबदारी पोलीस, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्यावर असते. परंतु, या यंत्रणा स्वतंत्र आणि निष्पक्ष असल्या पाहिजेत. जर त्यांच्यावर राजकीय दबाव असेल किंवा त्यांच्यात प्रामाणिकतेचा अभाव असेल, तर त्या प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.

याठिकाणी सत्ताधाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जर सत्तेतील काही लोकच अशा भोंदू व्यक्तींना संरक्षण देत असतील, त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असतील किंवा राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करत असतील, तर ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरते. अशा वेळी केवळ कायद्याचा अपमान होत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही ढासळतो.

'याला जबाबदार कोण?' या प्रश्नाचे उत्तर बहुआयामी आहे. सर्वप्रथम, जबाबदारी त्या व्यक्तीची आहे जी अंधश्रद्धेचा वापर करून शोषण करते. दुसरे म्हणजे, त्या यंत्रणांची जबाबदारी आहे ज्या अशा कृत्यांना रोखण्यात अपयशी ठरतात. तिसरे म्हणजे, सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, ज्यांनी कायद्याची निष्पक्ष अंमलबजावणी सुनिश्चित करणे अपेक्षित आहे. आणि शेवटी, समाजाचीही जबाबदारी आहे, जो अशा व्यक्तींना अंधश्रद्धेने पूजतो.

समाजातील अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानामुळे निर्माण होत नाही. ती भीती, असुरक्षितता आणि आशेच्या शोधातूनही निर्माण होते. त्यामुळे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि लोकांना तर्कशुद्ध विचार करण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

महिलांच्या सशक्तीकरणालाही येथे विशेष महत्त्व आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक जागरूकता यामुळे महिलांना अशा शोषणापासून वाचवता येऊ शकते. त्याचबरोबर, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आधार मिळवून देणेही आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी अशा घटनांचा निष्पक्षपणे पर्दाफाश केला पाहिजे आणि समाजामध्ये जागरूकता निर्माण केली पाहिजे. सामाजिक संघटना आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींनीही अधिक सक्रिय भूमिका घेणे आवश्यक आहे.

शेवटी, हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या आत्मपरीक्षणाचा आहे. आपण खरोखरच पुरोगामी आहोत का? की आपण अजूनही अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेले आहोत? जर श्रद्धेच्या नावाखाली शोषण होत असेल आणि आपण त्याकडे दुर्लक्ष करत असू, तर आपली पुरोगामी ओळख ही केवळ दिखावा ठरते.

महाराष्ट्राच्या प्रबोधनपर परंपरेला खऱ्या अर्थाने जपायचे असेल, तर केवळ कायदे बनवून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजामध्ये विवेकाची रुजवणूक आणि प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. तेव्हाच अंधश्रद्धामुक्त, न्याय्य आणि खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्र घडू शकतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
लेखक, समाजशास्त्राचे
अभ्यासक

# स्ट्रोकविषयी जागरूक रहा - प्रत्येक मिनिट महत्वाचा आहे - डॉ. अमित भट्टी

स्ट्रोक हा जगभरात अपंगत्व आणि मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. पण वेळेवर ओळख झाल्यास अनेक प्रकरणे टाळता येऊ शकतात किंवा योग्य उपचार करता येतात. जेव्हा मेंदूच्या एखाद्या भागाला जाणारा रक्तपुरवठा थांबतो किंवा कमी होतो, तेव्हा स्ट्रोक होतो. त्यामुळे मेंदूला आवश्यक ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळत नाहीत. काही मिनिटांतच मेंदूतील पेशी मरायला लागतात, त्यामुळे तात्काळ वैद्यकीय उपचार घेणे खूप गरजेचे आहे.

डॉ. अमित भट्टी सांगतात की, स्ट्रोक ही एक वैद्यकीय आपत्कालीन स्थिती आहे, जिथे प्रत्येक मिनिट खूप महत्त्वाचा असतो. स्ट्रोक झाल्यावर, जर मेंदूकडे जाणारा रक्तपुरवठा लगेच पुन्हा सुरू झाला नाही, तर प्रत्येक मिनिटाला सुमारे २० लाख मेंदूतील पेशी नष्ट होऊ शकतात. त्यामुळे लक्षणे लवकर ओळखून तात्काळ उपचार घेतल्यास कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो.''

स्ट्रोकचे प्रकार

स्ट्रोक मुख्यत्वे दोन प्रकारचा असतो. सर्वात सामान्य प्रकार म्हणजे इस्केमिक स्ट्रोक. यामध्ये मेंदूला रक्त पुरवणारी रक्तवाहिनी ब्लॉक होते, ज्यामुळे मेंदूचा रक्तपुरवठा थांबतो. दुसरा प्रकार म्हणजे हॅमरेजिक स्ट्रोक, ज्यामध्ये मेंदूमधील एखादी रक्तवाहिनी फुटते आणि आजूबाजूच्या मेंदूच्या पेशींमध्ये रक्त साचते. या दोन्ही प्रकारांमध्ये तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आणि विशेष उपचाराची गरज असते.

डॉ. अमित भट्टी यांच्या मते, वेळेत निदान आणि तात्काळ उपचार केल्यास डॉक्टर मेंदूतील रक्तपुरवठा पुन्हा सुरू करू शकतात आणि पुढील नुकसान टाळू शकतात. रक्त गाठी विरघळवणारी औषधे आणि सूक्ष्म शस्त्रक्रियासारखे आधुनिक न्यूरोइंटरव्हेन्शनल उपचार स्ट्रोकमधून वाचण्याची आणि बरे होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढवतात.

लक्षणांची ओळख

स्ट्रोक उपचारातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे लक्षण ओळखण्यात उशीर होणे. अनेक लोक सुरुवातीच्या लक्षणांना ओळखू शकत नाहीत आणि त्यामुळे महत्त्वाचा उपचार वेळ गमावतात.

डॉक्टर स्ट्रोकची लक्षणे त्वरित ओळखण्यासाठी फास्ट पद्धतीचा वापर करतात:

(चेहऱ्याचा एक भाग झुकणे): चेहऱ्याचा एक भाग असमान किंवा सुन्न वाटते.

(हात कमजोर होणे): एक हात वर उचलणे किंवा धरता येणे कठीण होते.

(बोलण्यात अडचण): अस्पष्ट किंवा अडखळत बोलणे.

(वैद्यकीय मदत घेण्याची वेळ): त्वरित वैद्यकीय उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते.

इतर लक्षणांमध्ये अचानक चक्कर येणे, तीव्र डोकेदुखी, गोंधळ, दिसण्यात अडचण, किंवा संतुलन गमावणे यांचा समावेश होऊ शकतो. या पैकी कोणतीही लक्षण अचानक दिसल्यास तात्काळ वैद्यकीय तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

लक्ष्यात घ्यायचे धोके

स्ट्रोक कोणत्याही वयाच्या लोकांना होऊ शकतो, पण काही वैद्यकीय परिस्थितीं स्ट्रोकचा धोका वाढवतात. उच्च रक्तदाब हा सर्वात मोठा धोका मानला जातो. त्याशिवाय मधुमेह, जास्त कोलेस्ट्रॉल, धूम्रपान, लठ्ठपणा, बसून राहणारी जीवनशैली आणि हृदयाचे आजार देखील स्ट्रोक होण्याची शक्यता वाढवतात.

डॉ. अमित भट्टी यांच्या मते, नियमित आरोग्य तपासण्या, योग्य औषधे आणि जीवनशैलीत बदल करून या धोका घटकांचे व्यवस्थापन केल्यास स्ट्रोकचा धोका खूप कमी होऊ शकतो. प्रतिबंधात्मक काळजी आणि जागरूकता या आजाराचा ताण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

वेळेवर उपचाराचे महत्त्व

वैद्यकीय विज्ञानातील प्रगतीमुळे गेल्या काही वर्षांत स्ट्रोकच्या उपचारात मोठा बदल झाला आहे. इंटरव्हेन्शनल न्यूरोलॉजीच्या मदतीने तज्ज्ञ डॉक्टर मेंदूच्या धमन्यांमधील रक्ताच्या गाठी कॅथेटर वापरून काढू शकतात, ज्याला मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी असे म्हणतात. जर ही प्रक्रिया वेळेत केली गेली, तर रक्तप्रवाह पुन्हा सुरू होतो आणि रुग्णाची बरे होण्याची शक्यता खूप वाढते.

स्ट्रोकनंतर लवकर पुनर्वसन (रिहॅबिलिटेशन) करणे तितकेच महत्त्वाचे आहे. फिजिओथेरपी, स्पीच थेरपी आणि ऑक्युपेशनल थेरपीमुळे रुग्ण स्वावलंबी बनतात आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा होते.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरमध्ये विशेष स्ट्रोक क्लिनिक

स्ट्रोकबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि रुग्णांना विशेष उपचार देण्यासाठी, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर २० तारखेला एक विशेष स्ट्रोक क्लिनिक सुरू करत आहे.

हे क्लिनिक दर शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सुरु राहील, जिथे रुग्ण स्ट्रोक प्रतिबंध, लवकर निदान, आधुनिक उपचार आणि स्ट्रोकनंतरची काळजी याबद्दल तज्ञांचा सल्ला घेऊ शकतील.

डॉ. सौरभ नागर, सेंटर हेड, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर, म्हणाले:''वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरमध्ये आमचा उद्देश म्हणजे तज्ज्ञ न्यूरोलॉजिकल उपचार अधिक मजबूत करणे आणि रुग्णांना वेळेत निदान व आधुनिक उपचार मिळवून देणे आहे. स्ट्रोक क्लिनिकची सुरूवात ही समुदायात जागरूकता वाढवणे, लवकर उपचार करणे आणि संपूर्ण स्ट्रोक व्यवस्थापन सुधारण्याकडे एक पाऊल आहे.''

प्रतिबंध हे सर्वोत्तम संरक्षण आहे

स्ट्रोक जीवनासाठी धोकादायक असू शकतो, पण अनेक प्रकरणे टाळता येऊ शकतात. निरोगी जीवनशैली राखणे हा धोका कमी करण्याचा मुख्य मार्ग आहे. नियमित व्यायाम करणे, संतुलित आहार घेणे, रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे, धूम्रपान सोडणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे यामुळे स्ट्रोक होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

# मराठवाडा, विदर्भ,पश्चिम महाराष्ट्रात दरोडा टाकणारी अंतरजिल्हा टोळी जेरबंद स्थानिक गुन्हे शाखा हिंगोलीची कार्यवाही

## जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलम रोहन यांची पत्रकार परिषदेत माहिती

* आत्ताच एक्सप्रेस
**गोपालराव सरनायक**

**हिंगोली–** मराठवाडा, विदर्भ,पश्चिम महाराष्ट्रात दरोडा टाकणारी अंतरजिल्हा टोळी जेरबंद केली असून स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली ने हि कार्यवाही केली असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलम रोहन यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली असून या गुन्हेगारांवर पुणे परिसरातील १७ पेक्षा जास्त माला विरुध्दच्या गुन्हयाचा समावेश सुद्धा आहे.

याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की दि.१४.०३.२०२६ रोजी फिर्यादी नामे संदिप देवराव तनपुरे रा. नांदुरा देवी यांनी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे फिर्याद दिली की, फिर्यादी हे दि.१३.०३.२६ रोजी रात्री १०.०० वा. चे दरम्यान हिंगोली ते नांदुरा देवी असा मोटर सायकलने जात असतांना जवळा पळशी रोडवर एक काळ्या रंगाची स्कार्पिओ गाडी उभी असलेली फिर्यादीस दिसली व सदर गाडीने फिर्यादी तनपुर यांचा पाठलाग सुरु केला व खांबाळा गावच्या फौजी धाब्याच्या पुढे सदर स्कार्पिओ गाडी फिर्यादीच्या मोटर सायकल समोर आडवी लावुन स्कार्पिओ गाडीतुन दोन इसम खाली उतरुन फिर्यादीला जबरदस्तीने गाडीत टाकुन गाडीतील ईतर दोन ते तीन जणांनी मिळुन फिर्यादीस लोखंडी कत्याने व पाईपने मारहाण करुन फिर्यादी जवळचा मोबाईल व ४२,०००रु रोख रक्कम व मोटर सायकलची चाबी असा मुद्देमाल जबरीने चोरून नेल्या वरुन अज्ञात इसमांविरुध्द पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे गुरनं. १५५/२०२६ कलम १४०(३),३०९ (६), ३ (५) भाव्यासं प्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन तपास मपोउपनि श्रीमती वग्गे हया करत आहेत.

सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन डॉ. नीलाभ रोहन पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी सदर गुन्हा तात्काळ उघड करून आरोपींना तात्काळ अटक करण्या संदर्भाने पो.नि. मोहन भोसले स्थागुशा व पो.नि. शामकुमार डोंगरे पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण यांना सुचना देवुन सपोनि शिवसांब घेवारे यांचे विशेष तपास पथक नेमण्यात आले.

पोलीस पथकाने जवळपास २०० च्या वर सीसीटीव्ही फ ुटेजचा बारकाईने अभ्यास केला तसेच तांत्रीक विश्लेषन करून गोपनिय माहिती काढली असता सदर गुन्हा करणारी एक कुख्यात टोळी असुन सदर टोळी प्रमुख मुख्य गुन्हेगार हा सौरभ विलास शिंदे रा. फुलगाव ता. हवेली जि. पुणे याने त्याच्या टोळी मार्फत सदरचा दरोडा टाकुन मुद्देमाल लुटल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने पोलीस पथकाने गुन्हेगारांना पकडण्या संदर्भाने गोपनिय माहिती व तांत्रीक विश्लेषन केले असता सदरचे गुन्हेगार हे कोल्हापुर जिल्हयात कर्नाटक सिमे लगत असल्याची माहिती मिळाली त्यावरून स्थागुशा पोलीस पथकाने कोल्हापुर जिल्हयात जावुन आरोपी नामे १) सौरभ विलास शिंदे रा. पुणे नगर रोड सैनिक शाळेजवळ फुलगाव ता. हवेली जि. पुणे २) शुभम प्रकाश तापकीर रा. आदर्श चौक भिमा कोरेगाव ता. शिरुर जि. पुणे ३) गजानन संजय मैंदकर रा. पेरनेगाव मसोबा नगर ता. हवेली जि. पुणे ४) अभिजित बंडु गदळे रा. वाघोली उबाळे नगर गल्ली नं. २७ ता. हवली जि. पुणे ५) विधीसंघर्षग्रस्त बालक हे स्कार्पिओ कार कं. एमएच १२ वाय.एन. ३३०० सह मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे हजर करून अधिक विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली व त्यानंतर लागलीच वाशिम जिल्हयात ट्रक चालकाला अडवुन दरोडा टाकल्याचे सांगीतले. तसचे सदर गुन्हयासंदर्भाने टिप देणारा आरोपी नामे ६) गजानन गोविंदा गोरे रा. सोनखास ता. जि. वाशिम असा असल्याचे निष्पन्न झाले असुन सदर आरोपीस यापुर्वीच अटक करण्यात आली आहे.

सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांच्यावर पुणे व परिसरातील मालाविरुध्दचे १६ गुन्हे दाखल आहेत. तसेच हिंगोली जिल्हयात सन २०१७ मध्ये दरोडा टाकल्या संदर्भाने सुध्दा गुन्हा दाखल



आहे. सदरचे गुन्हेगार हे सराईत गुन्हेगार असुन पुणे जिल्हयातुन हद्दपार असल्याची प्राथमिक माहिती आहे. आरोपीकडुन चोरी गेलेली रोख रक्कम २६,०००/–रु व गुन्हयात वापरलेली स्कार्पिओ जिप व मोबाईल असा एकुण १६,००,०००/–रु (सोळा लाख रुपये) चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मिना, मोहन भोसले पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा, शामकुमार डोंगरे पो.नि. पो.स्टे. हिंगोली ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली शिवसांब घेवारे सपोनि, मपोउपनि श्रीदेवी वग्गे, पोउपनि माधव जिव्हारे, पोउपनि दिलीप मोरे, पोलीस अमलदार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, शिवाजी जालमिरे, साईनाथ कंठे, हरीभाऊ गुंजकर, नरेंद्र साळवे,

ज्ञानेश्वर गोरे व आकाश टापरे, दत्ता नागरे, मारोती काकडे, इरफान पठाण, प्रणिता मोरे, शिवाजी इंगोले, संदिप जाधव, पांडुरंग राठोड, धनंजय क्षीरसागर, ज्ञानेश्वर पायघन, नितीन गोरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, विक्की कुंदनानी सर्व ने. स्थागुशा हिंगोली यांनी केली आहे.

# गडावर आलेल्या भाविकांना चुलीवरचा महाप्रसाद, गडावर श्री रेणुका माता की जय चा जय कारा गुंजला

## गेल्या तीन दिवसात गुढीपाडवा चैत्र नवरात्र रामनवमीनिमित्त हजारो भाविकांनी श्री रेणुका माता श्री दत्तप्रभूंचे घेतले दर्शन, गडावर जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या लांब रांगा





* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

श्रीक्षेत्र माहूर – पवित्र सण गुढीपाडवा तसेच चैत्र नवरात्र महोत्सव ते येणाऱ्या रामनवमीनिमित्त माहूर गडावरील सर्व देवस्थाने भाविकांनी फुलले असून देवस्थान वरील प्रशासन विश्वस्त मंडळ भाविकांच्या सेवेत सज्ज असून आलेल्या हजारो भाविकांना गॅस तुटवडा असूनही चुलीवर ठोकळे जाळून महाप्रसाद तयार करून आनंदात पोटभर महाप्रसाद वाटप करत पिण्यासाठी फिल्टर चे पाणी देण्यात येत असल्याने येणारे हजारो भाविक मनोभावे आनंदात दर्शन होत असल्याने समाधान व्यक्त करताना दिसत आहेत

श्रीक्षेत्र माहूर गडावरील चैत्र नवरात्र महोत्सवात श्री रेणुका माता गडावर येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदान सुरक्षा व्यवस्था पिण्याचे पाणी दर्शन रांगेत पंखे कुलर तसेच सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात सीसीटीव्हीच्या नजरेत भाविकांनी गेल्या तीन दिवसापासून आनंदात दर्शन घेतले तर विश्वस्त मंडळाकडून श्री रेणुका मातेची नित्य आरती महावस्त्र अलंकार अर्पण पूजा तसेच कलाकारांना मातेचे अभंग गाण्यासाठी सुसज्ज स्टेजची व्यवस्था असल्याने येणाऱ्या भाविकांना मातेचे सुरेल आवाजात अभंग गीत भजन ऐकावयास मिळत असल्याने भाविकांचे यावर्षीचे दर्शन आनंदात होत आहे

श्री रेणुका देवी संस्थानचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हा सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे सचिव सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला उपाध्यक्ष तथा उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे कोषाध्यक्ष तहसीलदार अभिजीत जगताप यांचे सह विश्वस्त चंद्रकांत भोपी संजय कान्नव विनायकराव फांदाडे बालाजी जगत दुर्गादास भोपी अरविंद देव आशिष जोशी यांचे सह सर्व पुजारी तसेच व्यवस्थापक विजय राऊत लेखापाल योगेश साबळे सुरक्षा अधिकारी महादेव मुंडे तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यासह सुरक्षारक्षक स्वयंसेवक तसेच अन्नदान प्रमुख अरुण घोडेकर आणि आकाश वानखेडे हे आलेल्या भाविकांना कुठलीही अडचण भासू नये यासाठी तत्पर सेवा देत असून लिफ्ट आणि स्काय वॉक च्या कामामुळे थोडासा त्रास जाणवला तरीही भाविक मात्र भविष्यात लिफ्टने आरामात दर्शन घेता येईल या आनंदात पाचशे पायऱ्या चढ उतार करून आनंदात श्री रेणुका माता की जय असा जयकारा लावत दर्शन घेत आहेत गडावरील श्री दत्त शिखर संस्थान अनुसया माता संस्थान येथेही भाविकांनी उन्हाची तमान बाळगता आनंदात दर्शन घेत महाप्रसाद ग्रहण केले रामनवमी पर्यंत चालणाऱ्या चैत्र नवरात्र यात्रेत पोलीस तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा पत्रकाराच्या वतीने सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांचा मुंबई येथे महाराष्ट्रचे मुख्यमंत्री नामदार श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्याबद्दल हिंगोली जिल्हा पत्रकार च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

दैनिक 'लोकसत्ता'च्या 'जिल्हा निर्देशांक' उपक्रमातून जिल्ह्यांच्या सर्वांगीण कामगिरीचे जे विश्लेषण करण्यात आले, त्यात हिंगोली जिल्ह्याने नोंदवलेली उल्लेखनीय प्रगती ही निश्चितच प्रशंसनीय आहे. या यशामागे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, काटेकोर नियोजन आणि लोकाभिमुख प्रशासन महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विविध क्षेत्रांत समतोल विकास साधत जिल्ह्याला प्रगतीच्या दिशेने नेण्याचे त्यांचे प्रयत्न खरोखरच प्रेरणादायी आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणे म्हणजे केवळ त्यांचाच नव्हे, तर संपूर्ण हिंगोली जिल्ह्याचा सन्मान आहे. या गौरवामुळे जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडून इतरांसाठीही एक आदर्श निर्माण झाला आहे.

जिल्हाधिकारी श्री. राहुल गुप्ता यांना या यशाबद्दल पत्रकारासह सर्वच स्तरातून मनः पूर्वक अभिनंदन होत असून भविष्यातही त्यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हा अधिक प्रगतीपथावर जात राहो अशा शुभेच्छा त्यांना देण्यात येत आहेत. यावेळी हिंगोली येथील तुकाराम झाडे, कल्याणराव देशमुख, रामेश्वर अपूर्वा, प्रसाद आर्वीकर,सचिन कावडे, गोपालराव सरनायक, सुनिल पाठक, दिलीप हळदे,श्याम सोळंके,सुधाकर वाढवे, मजहर भाई, संदिप नागरे, निलेश गरवारे,संतोष भिसे, शेख अनिस भाई,श्रीधर वाळवंटे, बांगर, विलास जोशी, बाबुराव ढोकणे, गजानन मगर, राजेंद्र हलवाई,राजु गवळी,मिलिंद वानखेडे, श्रीमती शांताबाई मोरे, पल्लवी मुदगल, वृत्तपत्र,दूरचित्रवाणी,युटच्यूब पत्रकार सह जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, प्रशांत कारभारी यांचीही यावेळी उपस्थिती होती.

# हिंगोली जिल्हा आम आदमी पार्टी कडून शेतकऱ्यांच्या वैयक्तिक १६ एचपी च्या ट्रांसफार्मरसाठी आझाद मैदान येथे उपोषण सुरु



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यामधील सेनगाव तालुका अंतर्गत येणाऱ्या गोरेगाव झोन एक व गोरेगाव झोन २ या गोरेगाव महावितरण कार्यालय अंतर्गत राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स नाशिक यांनी २०१८ ते २०२१ असा कंत्राट घेतला होता. परंतु २०१६ पासून २०२१ पर्यंत तसेच २०२३ पर्यंत राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स यांनी शेतकऱ्यांना वैयक्तिक १६ एचपी चे ट्रांसफार्मर बसवून दिल्याचे निदर्शनास येत आहे.

सदरील कॉन्ट्रॅक्ट घेताना राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामधील सर्व कोटेशन भरलेल्या लाभधारक शेतकऱ्यांना वैयक्तिक १५ एस पी चे ट्रांसफार्मर बसवून देण्याची जबाबदारी स्वीकारली होती तसे टेंडर सुद्धा स्वतःच्या कंपनीच्या नावाने शासनामार्फत भरून घेतले होते. परंतु आता राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स यांनी शेतकऱ्यांनी रक्कम न दिल्यामुळे शेतकऱ्यांचे १६ एचपी चे वैयक्तिक ट्रांसफार्म जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले होते.

गुगुळ पिंपरी येथील १६ एचपी ट्रान्सपरंट पासून वंचित असलेले शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय गुगुळ पिंपरी समोर बारा दिवस बेमुदत उपोषण केले होते. शेवटच्या दिवशी कुटुंबासह आत्मदान करण्याचा इशारा सुद्धा दिला होता त्यामुळे महावितरण कंपनीला जाग आली व पुढील पंधरा दिवसांमध्ये पारदर्शकपणे चौकशी करून प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन अहवाल शेतकऱ्यांना प्रत्येक लाभार्थी वाईस देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु त्या आश्वासनानंतर दोन महिने उलटून सुद्धा अद्याप पर्यंत महावितरण कंपनी हिंगोली सर्कल यांच्याकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कुठल्याही प्रकारचा पंचनामा करून अहवाल देण्यात आला नाही.

तसेच राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स यांच्या टेंडरला कळ्या यादी टाकण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती त्याबाबत सुद्धा ठोस कारवाई करण्यात आली नाही. तसेच राणा इलेक्ट्रिकल्स वर्क्स यांच्या जाणीवपूर्वक हलकर्जीपणामुळे शेतकऱ्याचे सोळा एचपी वैयक्तिक ट्रान्सफर तात्काळ बसवून देण्याचे आश्वासन दिले होते ते सुद्धा पूर्ण केले नाही. १९ लाभार्थ्यांपैकी फक्त ०१ ट्रांसफार्म बाळू चिमणाजी पंडितकर यांचे बसवून देण्यात आले आहे.. उर्वरित लाभार्थ्यांचे तात्काळ ट्रांसफार्मर बसवून देण्याच्या मागणीसाठी आम आदमी पार्टी हिंगोली जिल्ह्याच्या वतीने मागणी मागणी होईपर्यंत बेमुदत आझाद मैदान मुंबई या ठिकाणी उपोषण चालू केले आहे..

# हिवरखेडा येथून श्रीक्षेत्र शेगाव कडे पाई दिंडीचे प्रस्थान

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील मौजे हिवरखेडा येथील मारुती मंदिर हिवरखेडा ते श्रीक्षेत्र शेगाव पायी दिंडी सोहळ्याचे आज शेगाव कडे प्रस्थान झाले आहे या दिंडीमध्ये सुमारे २० मुले तीन दिवसात शेगाव कडे जातात दिंडीचा पहिला मुक्काम डोणगाव येथे दुसरा मुक्काम पळशि येथे होतो व तिसरा मुक्काम श्रीक्षेत्र शेगाव येथे होतो.

गेल्या नऊ वर्षापासून ही परंपरा अखंड कायम आहे रामनवमीच्या दिवशी ही दिंडी शेगाव येथे मुक्कामी राहते दिंडी चालक गजानन गायकवाड आयोजक पत्रकार शिवशंकर निरगुडे, आकाश निरगुडे ,राम देसाई ,दत्ता देसाई ,माधव गायकवाड, बबन शिरसागर, जीवन हराळ, कैलास गायकवाड, आकाश हराळ, संतोष गायकवाड,राजू निरगुडे राजू हराळ ,मारुती ढोणे, महेश ढोणे, तुषार मंठेकर ,विठ्ठल चव्हाण आदी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



# करंगळीवर उचलला गोवर्धन पर्वत; भक्तांना दिला श्रद्धा–भक्तीचा संदेश

## श्रीमद भागवत कथेत गोवर्धन पूजेचा भक्तिमय सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** श्रीमद भागवत कथेत सोमवारी गोवर्धन पूजेचा पवित्र सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. यावेळी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून गोकुळातील गोपाळ, गवळणी व संवगाडी यांचे रक्षण केल्याची लीला कथेमध्ये सजीवपणे उलगडण्यात आली.

या प्रसंगी प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांनी गोवर्धन पूजेचे आध्यात्मिक महत्त्व अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट केले.




त्यांनी सांगितले की, संकटाच्या काळात परमेश्वर आपल्या भक्तांचे रक्षण करतो, फक्त त्याच्यावर अढळ श्रद्धा आणि विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

भाईश्रींनी अनेक संदर्भ, दाखले आणि प्रेरणादायी कथा सांगत भाविकांना भक्ती, श्रद्धा आणि नैतिकतेचा संदेश दिला. गोवर्धन पर्वत उचलण्यामागील तत्त्वज्ञान सांगताना त्यांनी अहंकाराचा त्याग, निसर्गपूजन आणि समाजातील एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. कथेमुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले असून, संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. गोवर्धन पूजेच्या निमित्ताने भाविकांनी भगवान श्रीकृष्णाच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत भजन–कीर्तनात सहभाग घेतला.

# रमजान ईद निमित्त प्रशांत राठोड यांनी मुस्लिम बांधवांच्या भेटी घेऊन दिल्या शुभेच्छा

## प्रशांत भाऊंच्या भेटीतून सर्वधर्मसमभावचा संदेश






*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

श्रीक्षेत्र माहूर – मंत्रालयीन सनदी अधिकारी प्रशांत भाऊ राठोड यांचा प्रवास लोकनेते या शब्दाला साजेसा सुरू असल्याने तालुक्यासह मुंबईत आलेल्या सर्व धर्मीयांना प्रत्येक कामात मदत करणे यासाठी त्यांचे नाव दोन्ही तालुक्यात प्रथम क्रमांकावर चर्चिले जात असल्याने सर्व धर्मीयांच्या सण-उत्सवासह लग्न निधन तसेच कुठलीही जयंती पुण्यतिथी सामाजिक कार्यात कोणाच्या निमंत्रणाची वाट न पाहता मदत करण्यासाठी हजर राहत असल्याने झालेल्या रमजान ईद निमित्त माहूर शहरात येऊन त्यांनी सर्वसामान्य मुस्लिम बांधवांसह गन मान्य नागरिकांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्याने शहरात सध्या त्यांच्याच नावाची चर्चा होताना दिसत आहे

माहूर किनवट तालुक्यात प्रशांत भाऊ राठोड यांनी वृक्ष लागवडीपासून जंगलात जंगली जनावरांसाठी पिण्याचे पाणी उपलब्धते पासून ते जात धर्म न पाहता अनाथ मुलींचे लग्न पुण्यतिथी जयंती सार्वजनिक कामांचे मेळावे तसेच भाईचारा सर्व धर्म समभाव टिकून राहावा यासाठी त्यांचे अहोरात्र प्रयत्न असतात सुट्टीच्या दिवशी वेळ वाया न घालवता तालुक्यातील छोटे मोठे लग्न समारंभ किंवा सामाजिक होत असलेल्या सर्व कार्यात कुठल्याही निमंत्रणाची मानपानाची वाट न पाहता ते हजर राहून सर्व धर्मीयांना सढळ हाताने मदत करत असतात

पवित्र रमजान ईद निमित्त त्यांनी थेट माहूर शहर गाठून शहरातील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या यावेळी ज्येष्ठ पत्रकार तथा सन्माननीय नागरिक कादरभाई दोसानी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सरफराज दोसानी प्रतिष्ठित व्यापारी सलीम भाई खाकरा यासीन भाई बाणानी तास किराणा चे संचालक इसाक भाई पत्रकार रफिक भाई गाईड शेख साबीर शेख उस्मान नगरसेवक प्रतिनिधी निसारभाई कुरेशी फिजा जनरल स्टोअर्स चे संचालक जाबीर भाई आतार फिरोज भाई अप्सरा जनरल स्टोअर चे संचालक आयुब भाई उस्मान भाई बत्ती वाले महमूद भाई शब्बीर भाई रहीम किराणाचे चे संचालक रहीम भाई आरिफ भाई यांचे सह ताज किराणाचे संचालक वसीम भाई सहारा स्टील येथे सौदागर यांचे सह शेकडो मुस्लिम बांधवांची त्यांनी यावेळी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या माहूर शहरासह वाईबाजार येथील हाजी उस्मान खान चांदखान पठाण यांचे सह शेकडो मुस्लिम बांधवांना त्यांनी भेट घेत गोंडवाडसा येथीलही मुस्लिम बांधवांची भेट घेतली

यावेळी त्यांचे सोबत श्री दत्तकृपा टी स्टॉलचे संचालक विजय भाऊ कांबळे किसन राठोड पत्रकार दत्तात्रय शेरेकर दिनेश पवार बंडू राठोड प्रदीप पवार रवि वायकुळे संजय गायकवाड बोधडी चे अशोक राजूरवार करण गेडाम यांचे सह मोठ्या संख्येने सर्वधर्मीय नागरिक उपस्थित होते

# पहाड फोडून शेकडो ब्रास मुरुमाची विक्री, वन विभागाच्या बाउंड्री पिल्लरला लागून खोदकाम करत हजारो ब्रास मुरुमाची लावली जात आहे विल्हेवाट

## फॉरेस्ट बाउंड्री पील्लर चे काम निकृष्ट, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी रोड फोडले परंतु जंगलाकडे दुर्लक्ष

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

श्रीक्षेत्र माहूर – माहूर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव माहूरला रुजू झाल्यापासून या ना त्या कारणाने चर्चेतच असून कधी जंगली जनावराचा मृत्यू विनाकारण रस्त्याचे कामे आडवीने जंगलात झालेल्या विकास कामात भ्रष्टाचार रोप लागवड करून रोपे रस्त्यावर फ ेकणे वण उद्यानाच्या कामात अनियमितता यासह इतर कामात भ्रष्टाचाराची बोंबाबोंब होत असताना आता मात्र कहरच झाला असून रस्त्यासाठी एक इंच ही जागा न सोडणारे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कर्मचाऱ्यांनी वन हद्दीसाठी बनविलेल्या पिल्लरला लागून मुरुम उत्खनन करून विक्री केल्याने आणखी कशात भ्रष्टाचार करायचा राहिला असल्यास जाण्याच्या आधी तोही करून टाकण्याआधी उपवन संरक्षक मनीषा पाटील सहाय्यक वनसंरक्षक किरण चव्हाण यांनी एखाद्या तरी प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी वन्यप्रेमी सह वन्यजीव प्रेमीतून होत आहे

नागरिकावर वन्य प्राण्यांचे झालेल्या हल्ल्यातील नुकसान भरपाईची रक्कम मजुरांचे मजुरीची रक्कम इथून भ्रष्टाचाराची सुरुवात केलेले वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय या ना त्या कारणाने सतत चर्चेत असते वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी आल्या आल्या अनेक विकास कामाचा प्रस्ताव पाठविला कामे मंजूर होऊन आली परंतु त्यामध्ये कमालीचा प्रचंड भ्रष्टाचार होईल याची कोणी कल्पनाही केलेली नव्हती किल्ल्याच्या दुरुस्तीचे रखडलेले काम वन विश्राम गृहाच्या दुरुस्तीचे रखडलेले काम वन उद्यानात नर्सरीतील झाडे लावणे यासह मोठी कोट्यावधीची विकास कामे रखडली असून कामांची देयके मात्र उचलल्याची चर्चा तालुका भर होत असून जंगलात झालेली विकास कामे कागदावर झाल्याने जंगली जनावरे गावाकडे धाव घेत आहेत संपूर्ण जंगल टकले झालेले दिसत असून जंगलात वनवे लागत असल्याने अब्जावधी झाडांच्या पडलेल्या बियांची राख रांगोळी होत आहे त्यामुळे येथे दहा वर्षात संपूर्ण जंगल टकले होऊन पर्यावरणात प्रचंड बदल घडत यावर्षीच उन्हाचा पारा ५० पुढे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही

माहूर तालुक्यातील वानोळा तांदळा गुंडवळ हडसणी कुपटी सह इतर जंगल भाग असलेल्या गावात रस्त्याची कामे होत असून त्यासाठी लागणारा मुरूम हा जंगलातून जात असल्याने १२ हजार पेक्षा जास्त रक्कम देऊन शासनाकडून बाउंड्री पिलर चे काम सुरू करण्यात येत असून सदरील पिलर चे काम ३ हजारात गुत्तेदारांना देण्यात येत असल्याने यामध्ये मोठ्या दगडांचा भरणा आणि मनमानी पद्धतीने जागा सोडून पिल्लर उभारणी होत असल्याने शेकडो हेक्टर वन जमीन बिल्डरांच्या कंत्राटदारांच्या घशात घातली



जात आहे पिल्लर मध्ये मोठ्या दगडांचा वापर होत असल्याने अनेक पिल्लर तुटून त्यातील मोठे दगड उघडे पडत असल्याने या कामात झालेल्या लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करणार कोण अशी चर्चा माहूर तालुक्यात होत आहे. कारण याआधी कुठल्याही कामाची साधी चौकशीही झालेली नाही या आधीचे उपवनसंरक्षकांनी प्रत्येक भ्रष्टाचारी कामात त्यांना पाठिंबा दिला परंतु नव्याने रुजू झालेल्या उपनसंरक्षक मनीषा पाटील सहाय्यक वन संरक्षक किरण चव्हाण हे कर्तव्यदक्ष कर्तव्य कठोर असल्याची चर्चा माहूर तालुक्यात झालेली असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्या कार्यकाळात झालेला एखाद्या तरी कामाची चौकशी करतील अशी आशा व्यक्त होत असून किमान कर्मचाऱ्यांनी पहाड फोडून विकून खालेल्या मुरमाची त्यांनी चौकशी करावी अशी मागनि वन प्रेमी वन्यजीव प्रेमीतून होत आहे.

# शेतकऱ्याचा मुलाची सऊदीत हज सेवेसाठी निवड, हजला गेलेल्या भाविकांच्या आरोग्याची घेणार रियाजखान फारुकी काळजी

**आत्ताच एक्सप्रेस**



**श्रीक्षेत्र माहूर** – तालुक्यातील आदिवासी व बंजारा बहुल क्षेत्रातील टाकळी येथील अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून पुढे आलेल्या एका शेतकऱ्याच्या मुलाने मोठे यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र आरोग्य सेवेत रायगड येथे कार्यरत असलेले औषधनिर्माण अधिकारी रियाजखाँन अजिजखाँन फारुकी यांची नुकतीच हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांसोबत वैद्यकीय पथकात निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत ही निवड करण्यात आली असून, देशभरातून हज यात्रेसाठी विविध पथके पाठवली जातात. त्यामध्ये वैद्यकीय पथकाला विशेष महत्त्व असते, कारण हे पथक हज यात्रेदरम्यान भाविकांच्या आरोग्याची काळजी घेते.

या वैद्यकीय पथकात रियाजखाँन फारुकी यांची निवड होणे ही माहूर तालुक्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब असून त्यांच्या यशामुळे परिसरातील युवकांमध्ये प्रेरणा निर्माण झाली आहे. देशभरातून सुमारे ४०० जणांची निवड करण्यात आली असून, त्यापैकी महाराष्ट्रातून सुमारे ३८ जणांचा समावेश आहे.

निवड झालेल्या अधिकाऱ्यांना सऊदी अरेबियामध्ये हज सेवेसाठी मोफत प्रवास, निवास व भोजनाची सोय भारत सरकारतर्फे करण्यात येते. तसेच सऊदी दूतावास आणि संबंधित विभागामार्फत आकर्षक मानधन देखील देण्यात येते.

शेतकऱ्याच्या घरातून आलेल्या या तरुणाने मेहनत, चिकाटी आणि सेवाभावाच्या जोरावर मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद असून, संपूर्ण माहूर तालुक्यासाठी अभिमानाची ठरत आहे.

# पी.एम. श्री हायस्कूल, वाई बाजार येथे १० वी सज्ञता उन्हाळी शिबिराचे उद्घाटन



*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

किनवट – वाई बाजार येथील जिल्हा परिषद पी.एम. श्री हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकरिता आयोजित २५ दिवसीय विशेष उन्हाळी मार्गदर्शन नव उपक्रम शिबिराचा आयोजन शाळेच्या वतीने मुख्याध्यापक अजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली

उद्घाटन सोहळा २३ मार्च रोजी शाळेतील शिक्षक वृंद विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. दहावी म्हणजे भीती नाही, तर प्रगतीची पहिली पायरी या ब्रीदवाक्यासह या शैक्षणिक उपक्रमाचा श्रीगणेशा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व अध्यक्षपद शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमजद खान हैदर खान पठाण यांनी भूषविले. यावेळी त्यांनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रगतीसाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. शाळेचे मुख्याध्यापक व प्रमुख मार्गदर्शक अजय राठोड यांनी आपल्या मार्गदर्शनात दहावीच्या वर्षाचे महत्त्व आणि अभ्यासाचे अचूक नियोजन यावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती गोल्हर मॅडम यांनी केलेल्या प्रभावी प्रास्ताविकाने झाली. त्यांनी शिबिराचा हेतू स्पष्ट केला. त्यानंतर थोरात सर व धडीले सर यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारंग साळुंके सर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता १० वीच्या वर्गशिक्षिका चौधरी मॅडम व वाळके सर व शाळेतील सर्व शिक्षकांनी,विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# पेट्रोल, डिझेल विक्रीवर निर्बंध; बाटल्या व कॅनमध्ये इंधन देण्यास मनाई

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**




**किनवट** – सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर किनवट तालुका प्रशासनाने एक महत्वपूर्ण आणि कडक निर्णय घेतला आहे. तालुक्यातील कोणत्याही पेट्रोल पंपावर आता बाटल्या, कॅन किंवा इतर उघड्या भांड्यांमध्ये पेट्रोल व डिझेल विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

किनवट तहसील कार्यालयाने दिलेल्या अधिकृत आदेशानुसार, इंधन पुरवठा सुरक्षित, पारदर्शक आणि नियंत्रित पद्धतीने व्हावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आता फक्त वाहनांच्या टाकीतच पेट्रोल आणि डिझेल भरले जाणार असून, पाणी किंवा इतर शीतपेयांच्या बाटल्या तसेच कॅनमध्ये इंधन देण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

प्रशासनाने या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी पेट्रोल पंप चालकांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. जर कोणताही पेट्रोल पंप मालक किंवा कर्मचारी उघड्या बाटल्या अथवा कॅनमध्ये इंधन विक्री करताना आढळून आला, तर त्याच्यावर तात्काळ कठोर कारवाई केली जाणार आहे. जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत संबंधित पेट्रोल पंपावर दंडात्मक कारवाई होऊ शकते तसेच त्यांचा परवाना रद्द करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी २० मार्च रोजी काढलेल्या आदेशातून हा स्पष्ट इशारा देण्यात आला असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. तालुक्यातील सर्व वाहनधारकांनी आणि नागरिकांनी प्रशासनाच्या या निर्णयाला सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अचानकपणे रस्त्यावर आडव्या आलेल्या कारला ऑटोची धडक, माहूर तालुक्यातील इवळेश्वर येथील ७ महिला गंभीर जखमी

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – माहूर तालुक्यातील मौजे ईवळेश्वर येथून आटोद्वारे माहूर शहरातील भारतीय स्टेट बँकेत बचत गटाच्या कामानिमित्त आलेल्या सात महिला आटोद्वारे परत जाताना टी पॉईंट समोरील हॉटेल आराध्या समोर अचानकपणे आडव्या आलेल्या कारला ऑटोची धडक बसल्याने सातही महिला गंभीर जखमी झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आल्याची घटना दि १९ रोजी ३ वाजता घडली आहे

माहूर तालुक्यातील मौजे ईवळेश्वर येथील सात महिला ऑटो करून माहूर येथे सकाळी आल्या होत्या इतर कामे आटोपून भारतीय स्टेट बँकेत बचत गटाचे कामे झाल्यानंतर दुपारी तीन वाजता त्या गावातील त्याच ऑटो द्वारे परत निघाल्या त्यांचे सोबत आटोच्या मागे दोन पुरुष मोटर सायकल वरून येत होते टी पॉईंट समोरील हॉटेल आराध्या समोर अचानक पणे कार आडवी झाली त्यामुळे ऑटो चालकाला ब्रेक लागले नाही परिणामी ऑटो कारवर जाऊन आदळला त्यामुळे आटोत बसलेल्या सातही महिला आडव्या तीडव्या रस्त्यावर फेकल्या गेल्या तर काही महिलांना ऑटोत काच तोंडासह अंगात घुसल्याने महिला गंभीर जखमी झाल्या.



जखमी झालेल्या महिलांमध्ये महादापूर येथील मनीषा राठोड वय २६ मुक्ता जाधव वय २७ माला बाई जाधव वय ३५ नीता जाधव वय २९ अनिता राठोड वय ३५ ममता जाधव वय ३० पुनम जाधव वय ४१ सर्व राहणार इवळेश्वर यापैकी मला बाई हिच्या डोक्या छातीला गंभीर जखमा झाल्या अपघात पाहून स्थानिक नागरिकांनी व कारचालकांनी त्यांना माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता येथे डॉ मंगेश नागरगोजे छाया मुधाळे ममता कणके सुंदर बोथिंगे दत्ता पालटवाड गजानन भोपळे अमित चुंगडे प्रीती कुबडे सिक्युरिटी गार्ड अर्चना खपाटे यांनी प्रथमोपचार करून १०८ ॲम्बुलन्सचे डॉ आकाश जाधव सिद्धार्थ मुनेश्वर यांचे देखरेखित पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813